# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २७३ - २३** **दिनांक : - २२/०८/२०२३**

**घरफोडी व मोटारसायकल चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक करुन ५ गुन्हांची उकल**
**पेल्हार पोलीस ठाणे - गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामगीरी .**

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दि. १६/०८/२०२३ रोजी २३.०० वा. ते दिनांक १७/०८/२०२३ रोजी ०६.०० वा. च्या दरम्यान रुम नं. ०१, साई निवास, बिल्डींग साई निवास मेडीकल, धानिव बाग रोड, वसई (पु.), ता. वसई, जि. पालघर येथील राहते घराची स्लायडिंग खिडकी कोणीतरी अज्ञात चोरटयाने उचकटून, त्या खिडकीतुन रुमच्या दरवाजाची कडी काढुन दरवाजा उघडून, त्यावाटे आत प्रवेश करुन, रुममधील ठेवलेले १५,०००/- रु.किं.चे मोबाईल फोन फिर्यादी यांचे संमतीशिवाय लबाडीचे इराद्याने घरफोडी चोरी करुन चोरुन नेले बाबत फिर्यादी श्री. समीर अब्दुल हमीद मलिक, वय - ४३ वर्षे, व्यवसाय - कपडे विकणे, रा. रुम नं. ०१, साई निवास, बिल्डींग साई निवास मेडीकल, धानिव बाग रोड, नवजीवन वसई (पु.), ता. वसई, जि. पालघर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन अज्ञात आरोपीतांविरुध्द पेल्हार पो.स्टे गु.रजि.नं. I ७७१/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ४५७, ३८० प्रमाणे दि. १७/०८/२०२३ रोजी १९.४५ वा. गुन्हा नोंद करण्यात आला.

वर नमुद गुन्हयाचे अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांना तांत्रीक विश्लेषणाद्वारे व गुप्त बातमीदार यांचेमार्फत मिळालेल्या माहीतीच्या आधारे आरोपी नामे - १) अलाउद्दीन अरशद खान, वय- १९ वर्षे, रा. नवजीवन, वसई पुर्व, ता.वसई, जि.पालघर, २) किसन रोहीत शुक्ला वय- २१ वर्षे, रा. नालासोपारा पुर्व, ता.वसई, जि.पालघर ३) विलास अशोक राजभर वय - १९ वर्षे रा. पेल्हार नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर, ४) साहिल इस्माईल सय्यद, वय - २४ वर्ष, रा. नालासोपारा पूर्व ता.वसई जि.पालघर, ५) राहुल सिताराम पटेल, वय २८ वर्षे, रा. नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर याना सदर गुन्हयांत ताब्यात घेवुन तपास केला असता त्यांनी सदर गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने वरील आरोपीतांना सदर गुन्हात अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीत यांचेकडे अधिक तपास केला असता त्यांचेकडून चोरीस गेलेले ०७ मोबाईल व एक बजाज कंपनीची पल्सर मोटारसायकल असा असा एकुण १,४३,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन पेल्हार पोलीस ठाणे अभिलेखावरील ४ व विनोबा भावे नगर पोलीस ठाणे बृहनमुंबई पोलील आयुक्तालयातील १ गुन्हा असे एकुण ५ गुन्हे उघडकीस आले आहेत.

**-उघडकीस आलेले गुन्हे -**

१) पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ७७१/२०२३, भा.दं.वि.सं. कलम- ४५७, ३८० प्रमाणे.
२) पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ७७७/२०२३ भा.दं.वि.सं. कलम- ४५७, ३८० प्रमाणे.
३) पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ७७८/२०२३ भा.दं.वि.सं. कलम- ३८० प्रमाणे.
४) पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I ७७९/२०२३ भा.दं.वि.सं. कलम- ३८० प्रमाणे.
५) विनोबा भावे नगर पोलीस ठाणे बृहनमुंबई गु.रजि.नं. I २६८/२०२३ भा.दं.वि.सं. कलम- ३७९ प्रमाणे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ- ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. वसंत लब्दे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. विजय पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. शिवानंद देवकर, पोलीस निरीक्षक (प्रशासन) पेल्हार पोलीस ठाणे, पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे स.पो.नि. सोपान पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, पो.अं.रवि वानखेडे, संजय मासाळ, निखील मंडलिक, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, सुजय पाटील, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.